

**KALEIDOSCOPE**

# 8th and 9th December, 2021

# NAAC Peer Team Visit






## भोसले कॉलेजला नॅक समितीची भेट

### दोन दिवस केली तपासणी : तीन सदस्यांचा समितीत समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

सावंतवाडी : येथील यशवंतराव भोसले एज्युकेशन सोसायटी सावंतवाडी संचलित, यशवंतराव भोसले कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदेने (नॅक) भेट देऊन तपासणी केली. दोन दिवस झालेल्या या तपासणी कमिटीत डॉ. नीरज महिन्द्रू, डॉ. प्रमोद हुराकडले व डॉ. उमा भंडारी यांचा समावेश होता.

यशवंतराव भोसले फार्मसी महाविद्यालयामध्ये तपासणी करण्यासाठी आलेल्या नॅक कमिटीने अहवाल सादर केला.

त्यांनी महाविद्यालयातील सर्व विभागांच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती व कागदपत्रे तपासणी करून, कामकाजाची पाहणी करून केलेल्या कामाची प्रशंसा केली. सन २०१५ मध्ये महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर नॅक तपासणीस पात्र झाल्यानंतर अवघ्या सहाव्या वर्षी नॅक तपासणीस अर्ज करणारे संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असणारे व महाराष्ट्रातील फार्मसीचे प्रथम हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदेने (नॅक) तपासणीमध्ये तपासणी अधिकाऱ्यांकडून स्वयंपरीक्षण अहवालानुसार महाविद्यालयाचे कसून मूल्यांकन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना परिणाम आधारित शिक्षण दिले जाते का, यासाठी कठोर तपासणी करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व काळानुरूप होत असणाऱ्या सातत्यपूर्ण व अद्ययावत बदलांची माहिती होण्यासाठी विविध औषधनिर्माण प्रकल्पांना औद्योगिक भेटी, रुग्णालयांना भेटी, रोगनिदान प्रयोगशाळांना भेटी देणे व तसेच या सर्व क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करणे; शासन, नेतृत्व आणि व्यवस्थापन, संस्थात्मक मूल्ये आणि सर्वोत्तम पद्धती, बाबींची स्वयंपरीक्षण मूल्यांकन करण्यात आली.



पुढारी

यशवंतराव भोसले फार्मसी महाविद्यालयांमध्ये नॅक कमिटीची तपासणी करण्यात आली. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष अच्युत सावंत भोसले व अन्य.

## यशवंतराव भोसले कॉलेजचे 'नॅक' मूल्यांकन

**सावंतवाडी : पुढारी वृत्तसेवा**

सावंतवाडी येथील श्री. यशवंतराव भोंसले एज्युकेशन सोसायटी सावंतवाडी संचालित, ऑफ फार्मसी महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदेने (नॅक) भेट देऊन तपासणी केली. दोन दिवस झालेल्या या तपासणी कमिटीत डॉ. नीरज महिन्द्रू, डॉ. प्रमोद हुराकडले व डॉ. उमा भंडारी यांचा समावेश होता. त्यांनी महाविद्यालयातील सर्व विभागाच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती व कागदपत्रे तपासणी करून कामकाजाची पाहणी करून केलेल्या कामाची प्रशंसा केली.

सन २०१५ मध्ये महाविद्यलायची स्थापना करण्यात आली व त्यानंतर नॅक तपासणीस पात्र झाल्यानंतर अवघ्या सहाव्या वर्षी नॅक तपासणीस अर्ज करणारे संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हातील मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत असणारे व महाराष्ट्रातील फार्मसीचे प्रथम हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदेने (नॅक) तपासणीमध्ये तपासणी अधीकाऱ्यांकडून स्वयंपरीक्षण अहवालानुसार महाविद्यालयाची कसून मूल्यांकन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना (OBE- Outcome Based Education) परिणाम आधारित शिक्षण दिले जाते का यासाठी कठोर तपासणी करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व काळानुरूप होत असणाऱ्या सातत्यपूर्ण व अद्ययावत बदलांची माहिती होण्यासाठी विविध औषधनिर्माण प्रकल्पांना औद्योगिक भेटी, रुग्णालयांना भेटी, रोगनिदान प्रयोगशाळांना भेटी देणे व तसेच या सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्याने महाविद्यालयात आयोजित करणे याचबरोबरीने व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम, उद्योजकता विकास कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विविध कार्यक्रमांचे नियोजन करणे व परिणाम आधारित शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे तसेच अभ्यासक्रमाचा पैलू, अध्यापन शिक्षण आणि मूल्यमापन संशोधन इ. अनेक बाबींची स्वयंपरीक्षण मूल्यांकन पत्राकानुसार तपासणी करण्यात आली.

डॉ. विजय जगताप हे २०१५ पासून संस्थेच्या प्राचार्य काम करत आहेत, त्यांचे या याकामी कर्मचाऱ्यांना अनमोल मार्गदर्शन मिळाले असून संस्थेचे कार्याध्यक्ष अच्युत सावंत-भोंसले व सर्व मॅनेजमेंट प्रतिनिधी यांचे प्रोत्साहन लाभले आहे. प्रा. विनोद मुळे यांनी अंतर्गत गुणवत्ता समन्वयक म्हणून काम पहिले असून, विभागप्रमुख प्रा. रश्मी महाबल, प्रा. स्पर्शा बांदेकर, प्रा. तुषार रुकारी आणि प्रा. रोहन बारसे याच बरोबर सर्व निकषप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

Sindhudurg Edition
Dec 12, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

## NAAC Peer Team Visit

NAAC Peer team visit is conducted at Yashwantrao Bhonsale College of Pharmacy, Sawantwadi on 8th and 9th December, 2021. The peer team committee members were as follow-

1. Dr. Neeraj Mahindroo
2. Dr. Pramod Hurakadale
3. Dr. Mrs. Uma Bhandari

The team members verified the criteria wise facilitates at the institute. The performance of the institute since establishment was evaluated by peer team members. The activities through different committees conducted by institute was evaluated by committee members.